SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004 MAHARASHTRA
PHONE: EPBX - 2609000 FAX:0091-0231-2691533 & 0091-0231-692333
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४ महाराष्ट्र
दूरध्वनी ईपीबीएक्स- २६०९००० संलग्नता टी-२ विभाग दूरध्वनी -०२३१ - २६०९०९१संचालक,बी.सी.यु.डी. कार्यालय, दूरध्वनी : (थेट) ०२३१ - २६०९०७०

Estd : 1962
NAAC 'A++' Grade
Accerediated by NAAAC (2021)
With CGPA3.52

जा.क्र. संलग्नता/टी-२/परिपत्रक/ दि. 30 MAY 2022
№ 00071

# परिपत्रक

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक,

सर्व संलग्नीत महाविद्यालये,

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**विषय:-** महाविद्यालय तसेच विभाग स्तरावर प्रलंबित असलेल्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्जांची तात्काळ पडताळणी करणेबाबत...

**संदर्भ:-** मा. शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे क्र.उशिसं/शिष्य-२०२१-२२/डीबीटी/५७८१, दि.३०/०५/२०२२ रोजीचे पत्र.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय संदर्भांकित पत्रास अनुसरून शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे यांचे सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग यांना उद्देशित केलेले पत्र अवलोकनी घेवून **विहित कालमर्यादेत** विद्यापीठ संलग्नीत सर्व महाविद्यालयांनी आवश्यक ती कार्यवाही आपल्या स्तरावरून त्वरीत करावी.

कोणत्याही परिस्थितीत महाविद्यालय स्तरावर एकही शिष्यवृत्ती अर्ज प्रलंबित राहणार नाही तसेच पडताळणी करिता प्रलंबित राहिलेल्या अर्जांबाबत भविष्यामध्ये उद्भवणाऱ्या बाबीस संबंधित महाविद्यालय सर्वस्वी जबाबदार राहील याची नोंद घ्यावी.

आदेशान्वये

श्री. विलास एस सोयम
उपकुलसचिव
संलग्नता टी-२ विभाग

सोबत- वरीलप्रमाणे

H:\january 2022\Circular 2019.docx

# महाराष्ट्र शासन
# शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ०१

web: www.dhepune.gov.in E-mail: schol.dhepune@gov.in
फोन नं.०२०/२६१२६९३९,२९७०७०९८ फॅक्स ०२०/२६१११९५३

क्र.उशिसं/शिष्य-२०२१-२२/डीबीटी/ ५६८९ दि.२६.०५.२०२२

ईमेलद्वारा तात्काळ

30 MAY 2022

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण विभाग.

विषय :- महाविद्यालय तसेच विभाग स्तरावर प्रलंबित असलेल्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्जांची तात्काळ पडताळणी करणेबाबत.

संदर्भ :- १.संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०२१/डीबीटी/१४५२०, दि. १८.१२.२०२१
२.संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०२१/डीबीटी/१४७३८, दि. २४.१२.२०२१
३.संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०२१/डीबीटी/१४७३८, दि. २४.१२.२०२१
४.संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०२१/डीबीटी/८३४, दि. १८.०१.२०२२
५.संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०२१/डीबीटी/४३९८, दि. २७.०४.२०२२

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, उच्च संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या महाडीबीटी पोर्टलवरील शिष्यवृत्तीकरीता विद्यार्थ्यांनी भरलेल्या अर्जांची शैक्षणिक संस्था तसेच विभाग स्तरावरुन तात्काळ पडताळणी करणेबाबत वेळोवेळी सूचना देण्यात आलेल्या आहेत.

तथापि दि. २६.०५.२०२२ रोजीच्या डीबीटी डॅशबोर्ड अहवालानुसार सन २०१८-१९, सन २०१९-२०, सन २०२०-२१ व सन २०२१-२२ मधील खालील प्रमाणे विभाग निहाय पडताळणीसाठी अर्ज प्रलंबित असल्याचे आढळून येत आहेत.

| अ. क्र. | विभागाचे नांव | महाविद्यालय स्तरावर प्रलंबित अर्जांची संख्या | | | विभाग स्तरावर प्रलंबित अर्जांची संख्या | | | दुसऱ्या हप्त्यासाठी महाविद्यालय स्तरावर प्रलंबित अर्जांची संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१ |
| १ | अमरावती | 200 | 167 | 619 | 9 | 9 | 594 | 375 | 225 | 233 |
| २ | औरंगाबाद | 430 | 386 | 2260 | 3 | 7 | 210 | 1409 | 642 | 1223 |
| ३ | जळगांव | 382 | 102 | 625 | 0 | 1 | 98 | 147 | 79 | 179 |
| ४ | कोल्हापूर | 63 | 113 | 1989 | 1 | 18 | 365 | 553 | 355 | 563 |
| ५ | मुंबई | 63 | 136 | 363 | 1 | 1 | 84 | 71 | 97 | 146 |
| ६ | नागपूर | 153 | 84 | 633 | 2 | 3 | 98 | 79 | 32 | 65 |
| ७ | नांदेड | 268 | 169 | 2208 | 0 | 1 | 428 | 605 | 391 | 841 |
| ८ | पनवेल | 38 | 123 | 786 | 8 | 2 | 625 | 65 | 43 | 118 |
| ९ | पुणे | 183 | 186 | 2232 | 5 | 31 | 4051 | 496 | 417 | 688 |
| १० | सोलापूर | 76 | 19 | 163 | 0 | 1 | 39 | 91 | 80 | 87 |
| | एकूण | 1856 | 1485 | 11878 | 29 | 74 | 6592 | 3891 | 2361 | 4143 |

Scanned with CamScanner

महाडीबीटी पोर्टलवरील शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांनी भरलेल्या अर्जांवर रोजच्या रोज कार्यवाही करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना दुसऱ्या हप्त्याचा शिष्यवृत्ती लाभ देण्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज महाविद्यालयाच्या स्तरावरुन पडताळणी करणे आवश्यक आहे. कोणत्याही परिस्थितीत महाविद्यालय व विभागाच्या स्तरावर विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचे अर्ज प्रलंबित राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

सदरहू पडताळणी करीता प्रलंबित राहिलेल्या अर्जांबाबत भविष्यामध्ये उद्भवणाऱ्या प्रश्नास संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण / विद्यापीठाबाबत कुलसचिव / महाविद्यालयातील प्राचार्य सर्वस्वी जबाबदार राहतील याची नोंद घेण्यात यावी. तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दि. ३१.०५.२०२२ पर्यंत संचालनालयास सादर करावा.

(डॉ. प्रकाश बच्छाव)
शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

प्रत :- माहितीस्तव सविनय सादर.

१. मा. अप्पर मुख्य सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
२. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ३२.

प्रत :- माहिती व कार्यवाहीस्तव

१. मा. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे यांना तात्काळ कार्यवाहीसाठी.
२. प्राचार्य, सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालये यांना तात्काळ कार्यवाहीसाठी.

Scanned with CamScanner